# शास्त्रीय बालशिक्षणाच्या युगाची निर्मिती

गोमंतक

बंधु-भगिनिंनो,

'गोमंतक बालशिक्षण परिषद' स्थापन होऊन पाच वर्षे झाली. आज, राज्यस्तरीय बालशिक्षण परिषद भरविण्याची क्षमता तिने प्राप्त केली आहे, ही आनंद व्हावा अशी घटना आहे. बालशिक्षणाचा एक अभ्यासक या नात्याने, मी आपणांस ग्वाही देतो की, गोमंतकाच्या शैक्षणिक आणि आर्थिक-सामाजिक विकासाच्या इतिहासातील ही एक महत्त्वाची घटना ठरणार आहे. कारण, असे घडविण्याची ताकद खुद्द बालशिक्षणातच आहे; आणि त्याचबरोबर आपण, इथे जमलेल्या सर्वांनी, गोमंतकातील समाजकार्याच्या क्षेत्रात बालशिक्षणाला एक महत्त्वाचे स्थान प्राप्त करून दिले आहे. याबद्दल मी आपले मनापासून अभिनंदन करतो.

बालकाचे तीन ते सहा किंवा आठ वर्षांपर्यंतचे वय हे, साधारणपणे, बालशिक्षणाचे वय मानले जाते. बालकातून पुढे निर्माण होणारा प्रौढ कसा असेल हे, या वयात बालकाला मिळणारे वातावरण आणि शिक्षण या दोन घटकांवर अवलंबून असते. अलीकडे या दोन्हींचे नेमके शास्त्र विकसित झाले आहे. या शास्त्राला अनुसरून जर बालकाला वाढण्याचे नि शिकण्याचे वातावरण मिळाले तर त्याचे अनुकूल परिणाम त्या बालकाला आणि ते बालक ज्या समाजाचा घटक आहे त्या समाजाला प्राप्त होतात. परंतु, जर, बालकाला लहान वयात या गोष्टींपासून वंचित राहावे लागले तर त्याचे विपरीत परिणाम, त्या व्यक्तीला आणि तिच्या समाजालाही भोगावे लागतात. त्यामुळे, बालवयाचा काळ हा अत्यंत कसोटीचा नि निर्णायक कालावधी असतो, हे आपण सर्वांनी ध्यानात घ्यावयास हवे. कारण, हे ध्यानात घेऊनच, एक सजग समाज म्हणून, आपल्याला कृतिशील व्हायचे आहे.

बालकांचा आयुष्याच्या सुरूवातीचा काळ हा त्यांच्या मूलभूत क्षमतांच्या विकासाचा आणि पायाभूत अशा कौशल्य विकासांचा काळ असतो. भाषा, बहुविध बुद्धिमत्ता, आणि विविध शारीरिक कौशल्ये यांच्या प्रगतीचा हा अत्युच्च काळ असतो; वेगाने विकास होण्याचा काळ असतो. एवढेच नव्हे तर हा काळ नेमका पकडला नाही,म्हणजे तो वाया गेला तर, मानवी जीवनाचा आधार असलेल्या या बाबी अपरिपक्व राहून पुढील आयुष्यात अडथळेच निर्माण करतात. हा काळ आणखी एका गोष्टीसाठी महत्त्वाचा आहे. आजच्या नि उद्याच्या काळात, ज्याचे सार्वत्रिक महत्त्व आहे अशा भावनिक विकासाचा नि सामाजिक संपर्काच्या कौशल्य विकासांचाही हा काळ आहे. समाजात योग्य त-हेने मिसळता येणे, दुसऱ्यांशी वेळोवेळी जुळवून घेता येणे,

लोकशाहीतील एक नागरिक म्हणून जबाबदारीने वागता येणे आणि जागतिक शांततेच्या स्थापनेसाठी पावले टाकता येणे, या गोष्टींचे बीजारोपण केवळ बालवयांतच होऊ शकते. म्हणून बालवयावर विशेष लक्ष देणे आवश्यक आहे.

बालकाने परिसरातील पहिली भाषा आत्मसात करण्याचाही हाच काळ असतो. भाषा आत्मसात करण्याची क्षमता घेऊनच मूल जन्माला येत असते. पुढे, भाषा ऐकण्याच्या व भाषा बोलण्याच्या जेवढ्या जास्त संधी मुलांना मिळतील, तेवढ्या प्रमाणात बालकाचे भाषेचे स्वयंशिक्षण होत जाते. जेवढे जास्त विविध त-हेचे भाषिक अनुभव मुलांना मिळतील, तेवढी त्यांची स्वभाषा समृध्द होत जाते. ही भाषासमृध्दी घेऊनच, मुले, आपले बौध्दिक व सामाजिक जीवन जगणार असतात, हे लक्षात घेतले तर, भाषा शिक्षणाचे वय म्हणूनही बालवयाचे महत्त्व अनिवार्य आहे.

थोडक्यांत असे की, बालकाचा व्यक्तिगत विकास, बालकाचा सामाजिक विकास, बालकाचा भाषिक विकास या तिन्ही गोष्टी, हातात हात घालून जाव्या लागतात. दुसऱ्यांशी जुळवून घेण्याची मानसिकता आणि स्वतःच्या भाव-भावनांचे विवेकाने नियंत्रण करता येणे या दोन क्षमता, लहान वयातच उगम पावतात आणि योग्य भाषिक अनुभवांनी त्या वृद्धिंगतही होतात.

हे सारे बालवयातच घडून येते याचे एकमेव कारण म्हणजे, सहा ते आठ वर्षापर्यंतचे वय हे मुलांचे मेंदू घडणीचे वय असते. माणसाचा मेंदू जन्मानंतरच प्रामुख्याने कार्यरत होत असतो. मेंदूची ऐंशी टक्के वाढ याच वयात पूर्ण होते; आणि ती कशा दिशेने पूर्णतेला जावी हे आपल्याला बऱ्याच प्रमाणांत ठरविता येते. याचे कारण असे की मुलांच्या मेंदूचा विकास हा त्यांना मिळणाऱ्या बाह्य वातावरणावर अवलंबून असतो. लहान वयांत मिळणाऱ्या अनुकूल वा प्रतिकूल अनुभवांवर अवलंबून असतो. बालशिक्षणाचे खरे कार्य इथे आहे. मेंद हा माणसाचा शिकण्याचा अवयव आहे. त्यामुळे त्याला 'शिकते' करणे, त्याला शिकते ठेवणे, त्याच्या शिकण्याच्या क्षमता वाढवत नेणे नि त्याची शिकण्याची कौशल्ये विकसित करणे या साऱ्या गोष्टींची जबाबदारी बालशिक्षणाला पेलायची असते. म्हणूनच अर्थात, बालशिक्षणाचे स्वतंत्र नि प्रगत असे शास्त्र अभ्यासावे लागते, व त्याला धरूनच बालशिक्षणाचा व्यवहार प्रत्यक्षात करावा लागतो. किंबहुना, यामुळेच 'शास्त्रीय बालशिक्षणाचे सार्वत्रिकीकरण' हेच उद्दिष्ट घेऊन, गोमंतक बालशिक्षण परिषदेला आपले कार्य पुढे न्यायचे आहे.

बालशिक्षणाच्या या व्यक्तिगत विकासाच्या पैलूबरोबरच, मला आपल्यापुढे, बालशिक्षणाच्या सामाजिक व आर्थिक परिणामांविषयी खासकरून बोलायचे आहे.

आजवर, सगळीकडेच बालशिक्षणावर अत्यंत तुटपुंजा खर्च केला जात आहे, कारण, हा खर्च आपण परिव्यय म्हणजे मानतो आहोत. परंतु अलीकडच्या, म्हणजे विशेषतः गेल्या दशकभरातल्या संशोधनांतून असे ठळकपणे

पुढे आले आहे की, बालशिक्षणावरील खर्च हा परिव्यय (ग) नसून ती राष्ट्र उभारणीसाठी होणारी प्रभावी गुंतवणूक आहे. ही, इतर अनेक कल्याणकारी प्रकल्पांपेक्षा कितीतरी अधिक लाभदायक अशी गुंतवणूक आहे.

बालशिक्षणावरील गुंतवणुकीचे हे महत्त्व आपण सर्वांनीच जाणून घेतले पाहिजे आणि आपला बालशिक्षणावरील खर्चाकडे पाहण्याचा दृष्टिकोण पूर्णतः बदलला पाहिजे. थोडीशी विस्ताराने नि जाणतेपणाने ही गोष्ट आपण समजावून घेऊ या.

अर्थशास्त्राच्या क्षेत्रात, देश-विकासाच्या दृष्टीने भांडवल-गुंतवणुकीच्या विषयाला अनिवार्य असे महत्त्व आहे. थोडेसे जागतिक इतिहासात डोकावले तर असे दिसून येईल, भांडवल गुंतवणुकीच्या संकल्पनेत गेल्या अर्धशतकातच खूपसा बदल झाला आहे. १९६० च्या दशकापर्यंत भौतिक भांडवल हाच मुख्यतः विकासाचा आधार मानला जात होता. १९६० सालापासून हे चित्र पालटून, मानवी भांडवलाची संकल्पना पुढे आली. शिक्षण (त्यातही उच्च व कौशल्यांचे शिक्षण) व आरोग्य यांवर गुंतवणूक करून राष्ट्रातील श्रमशक्तीची गुणवत्ता सुधारता येते, हे लक्षात आले. १९९० नंतर मात्र आरोग्याबरोबरच पायाभूत अशा प्राथमिक शिक्षणावर भर देणे, मानवी भांडवलाची प्रत सुधारण्याच्या दृष्टीने, अत्यावश्यक मानले जाऊ लागले. आज मी तुमच्यापुढे विषय मांडतोय तो असा की, 'पायाभूत शिक्षणा'ची संकल्पना विस्तारून त्यामध्ये बालशिक्षण व प्राथमिक शिक्षण असा दोहोंचाही समावेश करायला हवा. आज, आपल्या देशापुरता, आणि देशांमधील राज्यांपुरता विचार करायचा झाल्यास, असे दिसून येते की, १ एप्रिल २००९ पासून, ‘बालकाच्या मोफत व सक्तीच्या शिक्षणा'चा जो कायदा अस्तित्वात आला आहे त्यानुसार, प्राथमिक शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणावर व त्याची गुणवत्ता सुधारण्यावर आवश्यक तो खर्च करायला आपण बांधून घेतलेच आहे. आता प्रश्न आहे तो बालशिक्षणाचा. याविषयीचे माझे प्रतिपादन असे आहे की, बालशिक्षणावरील खर्च हा केवळ खर्च नसून ती फार लाभदायक अशी गुंतवणूक आहे; आणि या गुंतवणुकीचा ताबडतोबीचा लाभ म्हणजे त्याने प्राथमिक शिक्षणाचा दर्जा सुधारतो, आणि त्याचे दीर्घकालीन वैयक्तिक आणि सामाजिक लाभ तर पुष्कळच असणार आहेत. गेल्या दीड-दोन दशकांमध्ये झालेल्या यासंदर्भातील संशोधनांचा भरभक्कम आधार माझ्या या विधानाला आहे.

जेम्स हेकमन (गराशी बन्नालज्ञारप) हे अमेरिकेतील शिकागो विद्यापिठातील २००० सालचे नोबेल पारितोषिक विजेते अर्थशास्त्रज्ञ आहेत. त्यांचे, एकीकडे, बालशिक्षणाच्या आर्थिक लाभांवर संशोधन चालू असते. त्यांनी म्हटले आहे, ङ्ग(बालकांच्या)सुरूवातीची वर्षे आपण समृद्ध केली तर त्याने, शिक्षकांच्या हातांशी अधिक चांगली मुले येऊन, त्याने शाळांची उत्पादकता सुधारण्यास मदत होईल. शाळांचा दर्जा सुधारला तर अखेरीस श्रमशक्तीचा दर्जा सुधारेल; अशात-हेने, मानवी भांडवलातील सरकारी गुंतवणुकीचा लाभ मिळेल.ङ्घ

अमेरिकेत गरीब-वंचित मुलांसाठी 'पेरी प्रीस्कूल इनिशिएटिव्ह' या कार्यक्रमात १९६२ ते १९६७ या काळात त्यांच्यासाठी खास उघडलेल्या शास्त्रीय बालशाळांतून गेलेली मुले एकविसाव्या शतकाच्या सुरूवातीस ४० व्या वर्षात पदार्पण केलेली होती. या मुलांच्या बालशिक्षणावर सरकारने व कुटुंबांनी केलेला खर्च विचारात घेऊन त्यावरील सामाजिक स्वरूपाचे लाभ कशाप्रकारे झाले, याचा हेकमन व त्यांचे सहकारी यांनी अभ्यास केला. त्यांचे निष्कर्ष असे होते.

१. बालशिक्षण न झालेली ४० टक्के मुले माध्यमिक शिक्षण पूर्ण करतात. तर बालशिक्षण झालेली ९० टक्के मुले माध्यमिक शिक्षण पूर्ण करतात.
२. बालशिक्षण न झालेली ५ टक्के मुले कॉलेजप्रवेश घेतलेली होती तर, बालशिक्षण झालेल्या मुलांबाबत हे प्रमाण ४० टक्के होते.
३. बालशिक्षण न झालेली ४० टक्के मुले गुन्हेगारीत आढळली तर, बालशिक्षण झालेल्या मुलांबाबत हे प्रमाण १० टक्के होते.

• दुसऱ्या एका अभ्यासात, १८ व्या वर्षापर्यंत मुलांचा अभ्यास केला गेला त्यातून असे दिसले की, या

वयापर्यंत वेगवेगळया गुन्ह्यांसाठी अटक होण्याचे प्रमाण या कार्यक्रमांतर्गत बालशिक्षण झालेल्या मुलांपेक्षा इतर मुलांमध्ये ७० टक्के पेक्षा जास्त होते. इतर सामान्य निष्कर्ष असे होते की,शास्त्रीय बालशिक्षणाचा लाभ झाल्यामुळे,

१. व्यक्तिगत स्तरावर आर्थिक संपन्नतेच्या अधिक संधी,मिळून सामाजिक स्तर उंचावतो.
२. शास्त्रीय बालशिक्षणाने प्राथमिक-माध्यमिक शिक्षणाचा दर्जा सुधारतो.
३. बालवयातच सुरूवात केल्यास नागरिकत्वाचे, पर्यावरणाचे मूल्य संख्कार प्रभावीपणे घडविता येतात.
४. देशातील भावी गुन्हेगारीला आळा घालता येतो.
५. गुन्हेगारांवर खटले चालवणे, तुरूंगात सांभाळणे या सामाजिक खर्चाचे प्रमाण नेहमीच खूप मोठे असते तर, त्या तुलनेत बालशिक्षणाचा खर्च कमी असतो. बालशिक्षणातील गुंतवणुकीने पुढील काळातील हा सामाजिक खर्च बऱ्याच प्रमाणात वाचवता येतो.

शिकागो विद्यापिठातील संशोधनातून असे दिसून आले आहे की, बालशिक्षणातील १ डॉलरच्या गुंतवणुकीवर बालकाच्या पुढील जीवनभरात दरसाल १८ टक्के निव्वळ लाभ समाजाला प्राप्त होतो. हेकमन यांच्या सिद्धांतानुसार, प्रौढांचे व्यवसायांतर्गत प्रशिक्षण, शालेय शिक्षण आणि बालशिक्षण यांवर समान गुंतवणूक केली तर त्याचे मिळणारे लाभ तुलनेने बालशिक्षणाच्या बाबतींत सर्वांत जास्त आहेत. यातही, वंचित मुलांच्या

बालशिक्षणावर गुंतवणूक केल्याने होणारे सामाजिक व आर्थिक फायदे जास्तच आहेत. अमेरिकेतील रूपेरी प्रीस्कूल मॉडेल प्रोग्राम हा वंचित मुलांच्या बालशिक्षणाचा कार्यक्रम दीर्घकालचा आणि प्रसिद्ध असा आहे. १९६२ साली सुरू झालेल्या आणि त्यावेळी त्या शाळांतून बालशिक्षण घेतलेल्या मुलांचा त्यांच्या चाळीशीत केलेल्या अभ्यासातून असे दिसून आले आहे की, या मुलांवर केलेल्या गुंतवणुकीतून समाजाला दर डॉलरमागे १७ डॉलर्सचे उत्पन्न प्राप्त झाले आहे. इतर कुठल्याही गुंतवणुकीपेक्षा हा लाभ अधिक आहे. असे वेगवेगळया कार्यक्रमांचे अनुकालिक अभ्यास अशाच त-हेचे निष्कर्ष देतात. उदाहरणार्थ, अमेरिकेतील फेडरल रिझर्व बँकेचे अर्थतज्ज्ञ आर्थर रोलनिक व रॉब ग्रुनेवाल्ड (8हीी ठेअपळल रपब ठेल #पशुरश्रव) म्हणतात की, ङ्गसरकारच्या अनेक योजनाप्रकल्पांवरील गुंतवणुकीपेक्षा बालशिक्षणावरील गुंतवणुकीतून मिळणारा लाभ कितीतरी मोठा असतो.ङ्घ

बालशिक्षणामधील गुंतवणुकीचे केवळ आर्थिक लाभच मोठे असतात असे नाही तर त्याने शाळांमधील गळतीचे प्रमाण कमी होते. विद्यार्थ्यांची विषयवार कामगिरीही सुधारते. उदाहरणार्थ, एका प्रकल्पात (णींरह सीीरा) बालशिक्षण घेतलेल्या मुलांची कामगिरी इतर विद्यार्थ्यांपेक्षा जास्त चांगली होती. गणितात उत्तीर्ण होणारांची संख्या १६ टक्के वाढली तर वाचनात उत्तीर्णतेचे प्रमाण २४ टक्के वाढले. तसेच गणितातील कामगिरी ५१ टक्क्यांनी तर भाषेमधील कामगिरी २७ टक्क्यांनी वाढली.

अशाच एका बालशिक्षणाच्या प्रकल्पाच्या अभ्यासाचा असा निष्कर्ष आहे की ज्यांना योग्य वयात शास्त्रीय बालशिक्षणाचा लाभ झाला आहे अशा मुलांच्या बाबतींत गुन्हेगारीचे प्रमाणही ७० टक्क्यांनी कमी झालेले आहे. तर दुसऱ्या बाजूला या मुलांचे महाविद्यालयांत जाण्याचे प्रमाण वाढून, त्यांना अधिक उत्पन्नाच्या नोकऱ्या व अधिक संपन्न जीवन जगता आल्याचेही काही अभ्यासातून स्पष्ट झाले आहे.

अशात-हेचे अभ्यास आपल्या देशांत झालेले नाहीत ही आपली उणीव आहे. परंतु त्यामुळे इतर देशांमधील अभ्यासांनी दर्शविलेल्या निष्कर्षांचे मोल कमी मानता येणार नाही.

बालवयाचे महत्त्व, शास्त्रीय बालशिक्षणाचे योगदान, त्यावरील गुंतवणुकीवरील सामाजिक-आर्थिक लाभ आणि अलीकडच्या मेंदूसंशोधनाने अधोरेखित केलेले बालवयातील अनुभवांधारित पण अनौपचारिक शिक्षणाचे महत्त्व लक्षात घेऊन, प्रत्येक राज्याने स्वतःचे नवे बालशिक्षण-धोरण आखण्याची गरज आहे. त्यासाठी, महाराष्ट्र शासनाने नेमलेल्या (१९९४-९५) 'राज्यस्तरीय बालशिक्षण समिती'चा अहवाल खूपच शास्त्रीय व खूपच उपयुक्त आहे. या अहवालाने आपल्यासमोर ठेवलेल्या काही सूचनांचा त्वरीत उपयोग करणे, गोमंतक शासनाला शक्य आहे.

१. गोवा प्रदेशातील बालशिक्षणाला शास्त्रीय वळण देऊन, त्याच्या सार्वत्रिक अंमलबजावणीसाठी, स्वायत्त स्वरूपाचे या क्षेत्रातील तज्ज्ञांचे 'बालशिक्षण मंडळ' स्थापन करावे.

२. केंद्र सरकारच्या पुढाकाराने चाललेल्या अंगणवाड्यांचे रूपांतर उत्तम दर्जाच्या बालवाड्यांत करण्यासाठी योजना आखावी, यांतून बालयातील आरोग्य व शिक्षण या दोहोंचीही दखल घेतली जाईल.
३. बालशिक्षणात काम करणारी शिक्षिका उच्च शिक्षित असावी व तिला शास्त्रीय बालशिक्षणाचे प्रशिक्षण मिळण्यासाठी दोन वर्षे मुदतीचा पदव्युत्तर स्तरावरील शिक्षणक्रम विद्यापीठ स्तरावर सुरू करावा.
४. शास्त्रीय बालशिक्षणाच्या प्रचार-प्रसाराचे आणि पालक प्रबोधनाचे कार्य करण्यासाठी 'गोमंतक बालशिक्षण परिषदेस शासनाने आवश्यक ते सहाय्य करावे.
५. गोमंतक सरकारने एखादी तज्ज्ञ समिती गठित करून या सूचनांचा पाठपुरावा केल्यास, गोमंतकात नवे 'शास्त्रीय बालशिक्षणाचे युग' निर्माण होईल अशी मला खात्री आहे.

आता एका व्यक्तिगत गोष्टीचा उल्लेख करून मी माझे भाषण संपवतो. यापूर्वी दोन-चार वेळा मी गोव्यात येऊन गेलो. माझा प्रत्येक वेळचा अनुभव असा आहे की, गोव्याच्या भूमीवर पाय ठेवला की मला 'हिरवे' झाल्यासारखे, नवी ऊर्जा प्राप्त झाल्यासारखे वाटते. माझ्या कामांना अधिक जोम येतो. गोमंतकाच्या या देणगीसाठी कृतज्ञता व्यक्त करून मी आपली रजा घेतो.

❖